# सहसंचालक, तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय, नागपूर

शासकीय तंत्रनिकेतन परिसर, सदर, नागपूर

दुरध्वनी क्र. 0712-6465145/46 कार्यासन दु. क्र. 0712-6465145

E-mail : ronagpur@dtemaharashtra.gov.in Website: rdtenagpur.org.in

**अत्यंत महत्वाचे** क्र.तशिस/प्राकाना/शैवि-1/Transfer/2018/ 2168

दिनांक:- 20 JUN 2018

प्रति,

संचालक/प्राचार्य,
सर्व अभियांत्रिकी / औषधनिर्माणशास्त्र /एचएमसीटी व वास्तुशास्त्र पदवी संस्था,
नागपूर विभाग, नागपूर.

विषय:- शैक्षणिक वर्ष 2018-19 मध्ये पदवी अभ्यासक्रमाच्या संस्थेतील विद्यार्थ्याचे संस्था बदल (College Transfer) करण्याबाबत

संदर्भ:- मा.संचालक, तंत्रशिक्षण संचालनालय, म.रा., मुंबई यांचे पत्र क्र. 2/एनजीसी/विसंब /2018/ 750, दि. 19 जुन 2018

शैक्षणिक वर्ष 2018-19 मध्ये पदवी अभ्यासक्रमाच्या संस्थेतील विद्यार्थ्याचे संस्था बदल करण्याकरीता संदर्भिय परिपत्रान्वये निकष ठरवून दिलेले आहे. विद्यार्थ्यांना संस्था बदल करण्याकरीता संस्थेने खालीलप्रमाणे कार्यवाही करण्यात यावी.

1. संस्था बदल करण्याकरीता विद्यार्थ्यांना ना-हरकत-प्रमाणपत्र (NOC) देण्याकरीता अडवणूक करू नये.
2. विद्यार्थ्यांनी संस्था बदलाकरीता संदर्भिय पत्रासोबत दिलेल्या Annexure A (संदर्भीय परीपत्रकासह प्रपत्र संलग्न) मध्येच अर्ज करावयाचा आहे. सदरहू अर्जात Application ID, Institute Code, Course Choice Code अचुक दर्शविला आहे याबाबत संस्थेने तपासणी करूनच अर्ज या कार्यालयाकडे सादर करावा, प्रवेश बदल हा ऑनलाईन करावयाच्या असल्यामुळे Application ID, Institute Code, Course Choice Code अचुक असणे आवश्यक आहे त्याशिवाय संस्था बदल होणार नाही.
3. विद्यार्थी ज्या संस्थेत शिक्षण घेत आहे त्या संस्थेने विद्यार्थ्यास संस्था बदल करण्याकरीता NOC देतेवेळी संस्था बदलाच्या निकषात बसत असल्यास NOC प्रदान करावी व NOC ही विहित प्रपत्रात असणे बंधनकारण आहे. (संदर्भीय परीपत्रकासह प्रपत्र संलग्न)
4. विद्यार्थ्यांला ज्या संस्थेत बदल करावयाचा आहे अश्या संस्थेने सदरहू विद्यार्थ्यांचा विहित नमुन्यात Annexure A मध्ये अर्ज, पालक संस्थेची विहित नमुन्यात NOC प्राप्त करून जेवढे विद्यार्थी आपल्या संस्थेत संस्था बदलाने येणार आहे अशा सर्व विद्यार्थ्याचे अर्ज आपल्या संस्थेच्या विहित नमुन्यात NOC व रिक्त जागेसह विविध कालमर्यादेत एकत्रित या कार्यालयास सादर करावा.
5. संस्थेने रिक्त जागा दर्शवितांना अचुक दर्शविण्यात याव्या. रिक्त जागांबाबत पुढे काही प्रकरण उद्‌भवल्यास संस्थेचे प्राचार्य सर्वस्वी जबाबदार राहितील याबाबत नोंद घ्यावी.
6. विद्यार्थ्यांला **संस्था तसेच अभ्यासक्रम बदलासह व विद्यापीठ बदलासह** ज्या संस्थेत बदल करावयाचा आहे अश्या संस्थेने सदरहू विद्यार्थ्यांचा विहित नमुन्या अर्ज, पालक संस्थेची NOC, (विद्यापीठ बदलाकरीता विद्यापीठ पात्रता प्रमाणपत्र) प्राप्त करून एकत्रित अहवाल आपल्या संस्थेच्या NOC, रिक्त जागा व Annexure B मध्ये माहिती (Excel format मध्ये Soft Copy) या कार्यालयास सादर करावी. सदरहू विद्यार्थ्याच्या **संस्था बदलासह अभ्यासक्रम किंवा विद्यापीठ बदल** हा

**तंत्रशिक्षण संचालनालय, म.रा., मुंबई मार्फत करण्यात येणार आहे.** त्यामुळे तात्काळ कार्यवाही करावी.

7. प्रथम वर्षातून दुस-या वर्षात संस्था बदल करण्याकरीता प्रथम व व्दितीय सत्रात पास होणे किंवा दोन्ही सत्र मिळून एक विषय बॅक असणे आवश्यक आहे. दुसऱ्या वर्षातून तिसऱ्या वर्षात संस्था बदलीकरीता प्रथम वर्ष पुर्ण पास व तृतीय व चुतर्थ सत्रात पास होणे अथवा दोन्ही सत्र मिळून एक विषय बॅक असणे आवश्यक आहे.

8. **संस्था बदलीकरीता आवश्यक कागदपत्रे**:- १) सर्व गुणपत्रिका २) शिक्षण घेत असलेल्या संस्थेची विहीत नमुन्यात NOC 3) ज्या संस्थेत बदल हवा आहे त्या संस्थेची विहित नमुन्यात NOC (रिक्त जागेसह) ४) विहीत नमुन्यात विद्यार्थ्याचा Annexure A मध्ये अर्ज ५) विद्यापीठ पात्रता (आवश्यक असल्यास) ६) संस्था बदलाबाबतची कारणे ७) GAP Certificate (आवश्यक असल्यास) ८) सर्व प्रक्रिया ज्या संस्थेत विद्यार्थ्याला संस्था बदल हवा आहे त्या संस्थेच्या प्राचार्यामार्फत एकत्रित प्रस्ताव तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय, नागपूर येथे सादर करावा.

9. **विद्यार्थी अथवा त्यांचे पालक यांना या कार्यालयात संस्था बदलाबाबत प्रस्तावासह पाठवू नये.**

वरीलप्रमाणे प्रक्रिया ही विहित मुदतीतच करावयाची असल्याने त्याबाबतचे प्रस्ताव **शनिवार दि. 30/06/2018 पर्यंतच स्विकारण्यात येईल** याबाबत सर्व संस्थेने नोंद घ्यावी. त्यानंतर आलेले प्रस्ताव कुठल्याही परीस्थिती स्विकारले जाणार नाही.

(गुलाबराव ठाकरे)
सहसंचालक
तंत्रशिक्षण प्रादेशिक कार्यालय,
नागपूर

# तंत्र शिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य,

3, महापालिका मार्ग, पत्र पेटी क्रमांक 1967, मुंबई 400 001.
दूरध्वनी - 22620601, 22690602, 22641150/51, फॅक्स - 22692102.
E-mail : desk2@dtemaharashtra.gov.in Internet : http://www.dtemaharashtra.gov.in


परिपत्रक

क्रमांक :- २/एनजीसी/वि.सं.ब./२०१८/७५०
दिनांक : 19 JUN 2018

विषय : शैक्षणिक वर्ष २०१८-१९ मध्ये विनाअनुदानित अभियांत्रिकी, औषधनिर्माणशास्त्र, वास्तुशास्त्र व एचएमसीटी इ. पदवी अभ्यासक्रमाच्या संस्थेतील विद्यार्थ्यांचे पहिल्या वर्षानंतर पाठ्यक्रम बदल, तसेच पहिल्या, दुसऱ्या व तिसऱ्या वर्षानंतर संस्था बदल करण्याबाबत......

पहा : १) शासन अधिसूचना क्र. टीईएम-२०१८/सी.आर.२६/टीई-४, दि. ०५.०६.२०१८
२) शासन अधिसूचना क्र. टीईएम-२०१६/प्र.क्र.४७३(भाग-३)/तांशि ४, दि. २४.०४.२०१७
३) शासन अधिसूचना क्रमांक टीईएम - २०१५/सीआर २३६/टीई-४, दि. ११.०३.२०१६
४) महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २८- महाराष्ट्र विनाअनुदानित खाजगी व्यावसायिक शैक्षणिक संस्था (प्रवेश व शुल्क यांचे विनियमन) अधिनियम, २०१५

महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २८ - महाराष्ट्र विनाअनुदानित खाजगी व्यावसायिक शैक्षणिक संस्था (प्रवेश व शुल्क यांचे विनियमन) अधिनियम, २०१५ ची अंमलबजावणी शैक्षणिक वर्ष २०१६-१७ पासून करण्यात येत आहे. त्याअनुषंगाने संचालनालयाच्या अधिपत्याखालील पुर्णवेळ व्यावसायिक पदवीपूर्व तांत्रिक पाठ्यक्रमांच्या प्रथम वर्ष व थेट द्वितीय वर्षाचे ( अभियांत्रिकी व तंत्रज्ञान, औषधनिर्माणशास्त्र, वास्तूशास्त्र, आणि हॉटेल मॅनेजमेंट व खाद्यपेय व्यवस्था तंत्रज्ञान) नियम संदर्भ क्रमांक २ अन्वये प्रसिध्द करण्यात आले आहेत. तदनंतर दि. ०५/०६/२०१८ च्या अधिसूचनेद्वारे रिक्त जागांच्या गणनासंबंधीच्या तरतूदीमध्ये सुधारणा केलेली आहे, परंतू "विद्यार्थी स्थानांतरण" संदर्भातील दि. २४.०४.२०१७ च्या अधिसूचनेतील नियम क्र. १६ मध्ये कोणताही बदल केलेला नाही. त्यानुसार विनाअनुदानित अभियांत्रिकी/औषधनिर्माणशास्त्र/वास्तुशास्त्र/एच.एम.सी.टी या पदवी अभ्यासक्रमाच्या विद्यार्थ्यांच्या संस्था बदल, शाखा बदल इ. बाबत दि. २४.०४.२०१७ च्या शासन अधिसूचनेतील नियम क्रमांक १६ मधील तरतूदीनुसार विद्यार्थी संस्था बदल व शाखा बदल इ. साठी खालील तीन टप्प्यात कार्यवाही करण्यात येईल.

| टप्पा क्रमांक | तपशील | कार्यवाही | कालमर्यादा | कार्यवाही करणारे सक्षम प्राधिकारी |
|---|---|---|---|---|
| १ | अ) संस्था अंतर्गत शाखा बदल | संबंधित संस्थेच्या प्राचार्यानी प्रथम वर्षाच्या किंवा प्रथम व व्दितीय सत्रांच्या एकत्रित गुणांच्या आधारे गुणवत्तेनेसार शाखा बदलाची कार्यवाही करावी | विद्यापीठाचा निकाल जाहिर झाल्यापासून ५ दिवसांचे आत | संबंधित संस्थेचे प्राचार्य |
| | ब) संस्था बदल / शाखा बदल | प्राप्त विनंती अर्जानुसार विद्यार्थ्यांच्या गुणवत्तेच्या आधारे विहित नमुण्यातील अर्जावर आवश्यक ती माहिती भरून आवश्यक दस्तावेजासह त्यांचेकडील रिक्त जागांची माहिती व ना-हरकत प्रमाणपत्रासह प्रस्ताव अभ्यासक्रम निहाय सहसंचालक, तंत्र शिक्षण, विभागीय कार्यालये यांना सादर करावेत. | विद्यापीठाचा निकाल जाहीर झाल्यापासून ५ दिवस | संस्था बदलीने प्रवेश देणा-या संस्थेचे प्राचार्य |
| २ | अ) संस्था बदल (विद्यापीठांतर्गत) मान्यता | विना अनुदानित संस्थाकडून संस्था बदलाबाबत विद्यापीठा अंतर्गत प्राप्त अर्जाच्या (१—ब नुसार) अनुषंगाने सहसंचालक, तंत्र शिक्षण, विभागीय कार्यालये यांनी त्यांचे कार्यक्षेत्रात असणा-या संस्था बदलाचे प्रकरणी मान्यतेची कार्यवाही करावी | विद्यापीठाचा निकाल जाहीर झाल्यापासून १० दिवसांत | सहसंचालक, तंत्र शिक्षण, विभागीय कार्यालये |

| टप्पा क्रमांक | तपशील | कार्यवाही | कालमर्यादा | कार्यवाही करणारे सक्षम प्राधिकारी |
|---|---|---|---|---|
| | ब) संस्था बदल (विद्यापीठाबाहेर) /संस्था बदलासह शाखा बदल (विद्यापीठांतर्गत / (विद्यापीठाबाहेर) | सहसंचालक, तंत्र शिक्षण, विभागीय कार्यालये यांचेकडे १-ब नुसार प्राप्त होणा-या विद्यापीठाबाहेरील प्रस्तावांची केंद्रीभूत नियमावली २०१७-१८ मधील तरतदीनुसार छाननी / तपासणी करुन सोबतच्या Annexure B च्या विहित नमुण्यातील माहितीसह मान्यतेसाठी एकत्रित प्रस्ताव या संचालनालयास सादर करावा | विद्यापीठाचा निकाल जाहीर झाल्यापासून १० दिवसांत | सहसंचालक, तंत्र शिक्षण, विभागीय कार्यालये |
| ३ | संस्था बदल (विद्यापीठाबाहेर) /संस्था बदलासह शाखा बदल (विद्यापीठांतर्गत / विद्यापीठाबाहेर) मान्यता | सहसंचालक, तंत्र शिक्षण, विभागीय कार्यालये यांचेकडे २-ब नुसार प्राप्त होणा-या अर्जावर तंत्र शिक्षण संचालनालयामार्फत मान्यतेची कार्यवाही करण्यात येईल. | - | संचालक, तंत्र शिक्षण, मुख्य कार्यालय, मुंबई |

- टिप: **द्वितीय वर्ष संस्था बदल / शाखा बदलाच्या अर्जावरील कार्यवाही रकाना क्रमांक ४ मध्ये नमूद कालमर्यादा किंवा थेट द्वितीय वर्ष प्रवेशासाठीच्या रिक्त जागा प्रसिध्द होण्याच्या दिनांकाच्या २ दिवस अगोदर यापैकी जे आधि घडेल तोपर्यंत करण्यात येईल. सदर कालमर्यादेनंतर आलेल्या अर्ज दप्तरी दाखल करण्यात येतील याची नोंद घेण्यात यावी.**

विद्यार्थी संस्था बदल / शाखा बदलाच्या अनुषंगाने खालील सूचनांचे सहसंचालक, तंत्र शिक्षण, विभागीय कार्यालये / संबंधित संस्था / विद्यार्थी यांनी काटेकार पालन करावे.

१. सहसंचालक, तंत्र शिक्षण, विभागीय कार्यालये यांचे स्तरावरुन संस्था बदलास दिलेली मान्यता व संस्था स्तरावरुन संस्थेअंतर्गत शाखा बदलास दिलेली मान्यता याची माहिती मा. सचिव, प्रवेश नियामक प्राधिकरण, महाराष्ट्र राज्य, ८ वा मजला, न्यू एक्सेलसिएर बिल्डींग, ए के नायक मार्ग,फोर्ट, मुंबई ४०० ००१ यांना व या संचालनालयास सादर करावी.

२. विद्यार्थ्यांनी सोबत जोडलेल्या Annexure A च्या विहित नमुण्यात संस्था बदलासाठीचा अर्ज संस्था बदलीने प्रवेश देणा-या संस्थेत सादर करावा. सदर अर्जासोबत सध्या शिक्षण घेत असलेल्या संस्थेचे ना-हरकत प्रमाणपत्र, बदलीने प्रवेश देणा-या संस्थचे ना-हरकत प्रमाणपत्र, विद्यापीठ बदल असल्यास विद्यापीठ पात्रता प्रमाणपत्र, शिक्षणात खंड असल्यास त्याबाबत प्राचार्याचे प्रमाणपत्र किंवा रु.१००/-च्या स्टॅप पेपरवर शिक्षणातील खंडाबाबत प्रतिज्ञापत्र, प्रथम वर्ष किंवा थेट व्दितीय वर्ष प्रवेशाचे ॲलॉटमेंट लेटर (उपलब्ध असल्यास), गुणपत्रिका (साक्षांकीत) व संस्था बदल करण्यासाठीचे कारण या पृष्ठर्थ पुरावे यादस्तावेजासह सादर करणे अनिवार्य राहील. अपुर्ण अर्ज किंवा आवश्यक प्रमाणपत्र / कागदपत्र विना सादर केलेले अर्ज या संचालनालयास प्राप्त झाल्यास याबाबत काहीही न कळविता असे अर्ज दप्तरी दाखल तथा नस्तीबध्द करण्यात येतील याची सर्व सबंधितांनी नोद घ्यावी.

३. सध्या शिक्षण घेत असलेल्या संस्थेचे ना-हरकत प्रमाणपत्र, बदलीने प्रवेश देणा-या संस्थचे ना-हरकत प्रमाणपत्र व विद्यापीठ बदल असल्यास विद्यापीठ पात्रता प्रमाणपत्र प्राप्त करण्याची जबाबदारी पुर्णपणे संबंधित विद्यार्थ्यांची राहील.

४. विद्यमान संस्थेच्या संस्थाप्रमूखांनी (Present / Parent Institute) विद्यार्थ्यांना संस्था बदलास ना-हरकत प्रमाणपत्र देतांना त्यामध्ये Institute DTE.Code, Students Application ID, Course Choice Code, GAP इ. माहिती नमूद करणे अनिवार्य राहील.

५. संस्था बदल व शाखा बदलासह संस्था बदल याकरीता विद्यार्थ्यांनी ज्या विनाअनुदानित संस्थेसाठी विनंती केलेली आहे त्या विनाअनुदानित संस्थेच्या प्राचार्यांनी याबाबतच्या प्रस्तावावर कार्यवाही उपरोक्त कालमर्यादेत होईल याची खबरदारी घ्यावी व आवश्यक तो पाठपुरावा करावा. तसेच यासाठी विद्यार्थी किंवा पालक यांना वरिष्ठ कार्यालयात व्यक्तीश: पाठविल्यास त्याची दखल घेतली जाणार नाही.

६. विषयांकीत प्रकरणी कार्यवाही करतांना संदर्भ क्रमांक २ मधील संबंधित अभ्यासक्रमाच्या प्रवेश नियमावलीतील तरतुदी / नियम स्पष्ट असून याबाबतची कार्यवाही करतांना नियम तथा तरतुदींचे उल्लंघन झाल्यास संबंधित प्राधिका-यास जबाबदार धरण्यात येईल याची नोंद घ्यावी.

७. सर्व संस्था प्रमुखांना कळविण्यात येते की, बदली मागितलेल्या विद्यार्थ्यास या संचालनालयाचे मान्यता आदेश प्राप्त झाल्यानंतरच लिव्हींग सर्टीफीकेट द्यावे व कोणत्याही परिस्थितीत तत्पुर्वी ते देण्यात येवू नये. तसेच संबंधित विद्यार्थ्याच्या संस्था बदलीसाठी केवळ ना-हरकत प्रमाणपत्र निर्गमित केल्याच्या कारणास्तव त्यांचे संस्थेतील प्रवेश रद्द करु नये.

८. विद्यार्थी संस्था बदलास या संचालनालयाची / संचालनालयाने प्राधिकृत केल्यानुसार सहसंचालक, तंत्र शिक्षण, विभागीय कार्यालये यांची पुर्व मान्यता नसतांना संस्था बदलाने जाण्यास संस्थेने (Present / Parent Institute) लिव्हींग सर्टीफीकेट देणे व संस्था बदलाने प्रवेश देणा-या संस्थने (Aspiring Institute ) प्रवेश दिल्यास त्यास संचालनालयामार्फत मान्यता देण्यात येणार नाही. या संचालनालयाची व संचालनालयाने प्राधिकृत केलेल्या प्राधिका-याची पुर्व मान्यता नसतांना संस्था बदलीने प्रवेश दिल्याचे आढळून आल्यास विद्यार्थ्यांच्या होणा-या शैक्षणिक नुकसानीस संबंधित संस्था व संस्था बदलाने प्रवेश देणारी संस्था या दोन्ही संस्थाच्या संस्था प्रमूखांना जबाबदार धरून त्यांचे विरुध्द कारवाई करण्यात येईल.

९. द्वितीय वर्ष अभियांत्रिकी / औषधनिर्माणशास्त्र मधील विद्यार्थी संस्था बदलाची कार्यवाही थेट द्वितीय वर्ष प्रवेशासाठीच्या रिक्त जागा प्रसिध्द होण्याच्या दिनांकाच्या २ दिवसापुर्वीच्या दिनांकापर्यंत व या व्यतिरीक्त इतर विद्यार्थी संस्था बदलाच्या अर्जावर दि. १४.०८.२०१८ पर्यंत करण्यात येईल. सदर कालमर्यादेतनंतर प्राप्त झालेल्या संस्था बदलासाठीचे अर्जावर कोणतीही कार्यवाही न करता दप्तरी दाखल करण्यात येतील याची सर्व संबंधितांनी नोंद घेण्यात यावी. या कालमर्यादेपुर्वी विद्यापीठाचा किंवा संस्थेचा निकाल घोषित झाला नसेल तर, संबंधित विद्यार्थी शाखा बदल, संस्था बदल, संस्थाबदलासह शाखा बदल, संस्था शाखा बदलास विद्यापीठ बदल इ. मागणीचा विचार करण्यात येणार नाही.

( डॉ.अभय वाघ)
संचालक
तंत्र शिक्षण,महाराष्ट्र राज्य, मुंबई

प्रत, मा. सचिव, प्रवेश नियामक प्राधिकरण, महाराष्ट्र राज्य, ८ वा मजला, न्यू एक्सेलसिएर बिल्डींग, ए के नायक मार्ग,फोर्ट. मुंबई ४०० ००१ यांना माहितीसाठी सादर

प्रत माहिती व आवश्यक त्या कार्यवाहीसाठी अग्रेषित :-

१. सहसंचालक, तंत्र शिक्षण, विभागीय कार्यालय, मुंबई, पुणे, नाशिक, औरंगाबाद, अमरावती व नागपूर
त्यांना कळविण्यात येते की, उपरोक्त सूचना त्यांच्या कार्यक्षेत्रातील अभियांत्रिकी / औषधनिर्माणशास्त्र / वास्तूशास्त्र, एचएमसीटी पदवी अभ्यासक्रमाच्या संस्थाना त्यांचे स्तरावरुन कळविण्यात याव्यात.
२. प्राचार्य, सर्व विनाअनुदानित अभियांत्रिकी, औषधनिर्माणशास्त्र, वास्तुशास्त्र, एचएमसीटी पदवी महाविद्यालये, महाराष्ट्र राज्य
३. मा. कुलसचिव, सर्व अकृषी विद्यापीठे, महाराष्ट्र राज्य (पात्रता शाखा)
४. कार्यासन क्रमांक ३, मुख्य कार्यालय, मुंबई
५. कार्यासन क्रमांक २, निवड नस्तीस.

ANNEXURE - A

## APPLICATION FOR CHANGE OF COURSE OR INSTITUTION AFTER I, II OR III YEAR

1. Name of the Student (In Full) :
2. Application ID :
3. Academic year of Admission in the present Institute :
4. Whether Admission is under Supernumerary quota (Y/N) :
5. Address for correspondence with Pin code & Telephone Nos. ( if any) :
6. Name of parent / present Institute with DTE Code : DTE CODE ________ Name ________________
7. Course of Study Details : Year / Semester ________ Branch _____ Choice Code ________
8. Details of the Result of last exam.

| Branch / Faculty | Year / Semester | Year of Passing | Summer / Winter | No. of attempt | Percentage | University |
|---|---|---|---|---|---|---|
| 1. | 2. | 3. | 4. | 5. | 6. | 7 |
| | | | | | | |

9. Details of backlog subject (if any) :
10. Name and DTE code of aspiring institute where admission by transfer is sought : DTE CODE ________ Name ________________
11. Branch & Year / Semester and university in which admission by transfer is sought : Branch / Course ________ Year / Semester ________ Choice Code ________ University ________
12. Reasons for change of Institute/ change of branch and University : ________________

I the undersigned state that the information stated above is true to my knowledge and belief. I am fully aware that transfer / change of institute / branch is not a right and it is up to the authority to decide my case on the basis of merit.

**Date : / /2018** **Signature of Student**

Name and DTE code of the parent / present Institute: ________________

No ----------------- Date :- / /2018

**No Objection Certificate**

Certified that information furnished by applicant (Name) ---------------------- is verified form the record. His / Her admission was not under supernumerary quota / TFWS category.. This institute has no objection for his / her transfer from this college / institute.

Seal of College / Institute Signature of Principal

Name and DTE code of the Aspiring Institute: ________________

No ----------------- Date :- / /2018

**No Objection Certificate**

This institute has no objection & agrees to admit the above candidate Shri / Kum. ________________ to the branch ________ to Year / Semester ________ during the current academic year ________ . After admitting all the internal students and ex-students and exhausting the claims of change of branch of internal candidates, the vacancies in year and course ________ are ________ ( Nos.) I have ascertained the eligibility of the candidate for the above mentioned admission.

Seal of College / Institute **Signature of the Principal**

**Note: Institute's NOC can be issued on the letter head of the College / Institute separately if desired so by Director / Principal.**

Annexure B

Proposal for Change of Institue and Course ( with Change of University / within University) for A.Y. 2018-19

| Sr. No. | Name of the Students | Application ID | A.Y. of Admission in the current Institute | Whether Admission is under Supernumer quota (Y/N) | Parent / Current Institute detail | | | | | | | | Admiting / Transfer Institute | | | | | | Reason for Transfer of students ( if brief) | Remarks of Joint Director |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | | | DTE Code | Name of Institute | Year and Course name (e.g. 1st / 2nd / 3rd year --- --- Engg /tech.) | Choice Code Of course | Admission Year of column no. 8 | Name of University | Result [Passed / failed in one head] | % of Marks | DTE Code | Name of Institute | Year and Course name (e.g. 2nd /3 rd/ 4th year -- --- Engg /tech.) | Choice Code Of course | Vacancy | Name of University | | |
| 1 | 2 | 3 | 4 | 5 | 6 | 7 | 8 | 9 | 10 | 11 | 12 | 13 | 14 | 15 | 16 | 17 | 18 | 19 | 20 | 21 |
| | | | | | | | | | | | | | | | | | | | | |
| | | | | | | | | | | | | | | | | | | | | |
| | | | | | | | | | | | | | | | | | | | | |
| | | | | | | | | | | | | | | | | | | | | |
| | | | | | | | | | | | | | | | | | | | | |
| | | | | | | | | | | | | | | | | | | | | |
| | | | | | | | | | | | | | | | | | | | | |